# एम. बी. ए.- करियरची सोनेरी संधी

## (भाग-२)

पदवीनंतर नेमकं काय करावे आणि त्याप्रकारे भविष्याचे नियोजन करून योग्य तो निर्णय घेणे हे एक कठीण काम आहे. विशेषतः जर विद्यार्थी अंतिम वर्षामध्ये असतील आणि महाविद्यालयातून पदवीधर होणार असतील तर "पुढे काय?" हा प्रश्न त्यांच्यासमोर आ वासून उभा असतो. आपण सर्वजण या प्रक्रियेमधून जाऊन ह्या अंतिम दुविधेचा सामना केलेला आहे. या टप्प्यावर निर्णायक राहणे हे अत्यंत गरजेचे आहे, पण हे तितकेच तणावपूर्णही असू शकते. कुठल्या वर्गात प्रवेश करावा? नेमका काय अभ्यास करावा? किती वेळ अभ्यास करावा? कोणती पदवी मला यशाच्या शिखरापर्यंत घेवून जाईल? या स्पर्धात्मक युगात या सर्व प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना माहिती असणे गरजेचे ठरते. त्यामुळेच या पर्यायांबद्दल माहितीचा अभाव विद्यार्थ्यांना करियरबांधणीच्या संपूर्ण प्रक्रियेत स्पर्धात्मक युगामध्ये मागे टाकू शकतो.

एमबीए ही पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांना व्यवसाय, प्रशासन आणि व्यवस्थापन कार्यांचे ज्ञान आणि सिद्धांत प्रदान करते. एमबीए ही पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांना सैद्धांतिक आणि व्यावहारिक ज्ञान साधनांसह सुसज्ज करते जे व्यवसायाच्या आणि प्रशासनाच्या जगात मूलभूत घटक आहेत. एमबीए ही एक बहुविद्याशाखीय क्षेत्र म्हणून विज्ञान, वाणिज्य, कला या प्रत्येक शाखेतील व क्षेत्रातील पदवी धारकांचे स्वागत करते.

एमबीए या पदवीस प्रवेश घेतल्यानंतर सातत्य, सकारात्मकता, कार्यमग्नता ही गुणवैशिष्टे अत्यंत महत्वाची आहेत. यामुळे व्यक्तिमत्व विकास होण्यात मदत होते.मुळातच, एमबीए पदवी घेण्यामागे उद्दिष्टे हे अत्यंत चांगले करियर व व्यक्तिमत्वाचा संपूर्ण व संघात स्वरूप विकास हाच आहे. एमबीए पदवीच्या अभ्यासक्रमाचा भाग जसे की संघटनात्मक वर्तन, व्यवसाय पर्यावरण, व्यवस्थापकीय अर्थशास्त्र, आर्थिक व्यवस्थापन, विपणन व्यवस्थापन, व्यावसायिक कायदा, मानव संसाधन व्यवस्थापन, संशोधन, धोरणात्मक व्यवस्थापन, ई. अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यास केल्याने संघातस्वरूप व्यक्तिमत्व विकास आणि कौशल्ये यांचा विकास होत असतो.

इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की प्रत्येक वर्षी पालक आणि एमबीए करण्यास इछुक असणारे विद्यार्थी असा प्रश्न विचारतात की 'एमबीए करणे खूप कठीण आहे का?' 'एमबीए खूप क्लिष्ट आहे का'? याचे अगदी सोपे उत्तर आहे "अजिबात नाही". एमबीएला प्रवेश घेणे म्हणजे सकारात्मक राहून करियरचे नवीन मार्ग विकसित करून स्वत:च्याव्यक्तित्वाचे रूपांतर सर्जनशील व्यक्तिमत्वात करणे होय. तसेच वरील प्रश्न समस्या म्हणून न घेता आव्हाने म्हणून घेणे होय. व्यक्तिमत्व विकासामध्ये एखाद्या व्यक्तीचे अद्वितीय व्यक्तिमत्व बनवणारे संघटित विचार आणि वर्तन पद्धती प्रशिक्षणाने उदयास येतात.

विद्यार्थ्यांच्या संपूर्ण संघात-स्वरूप व्यक्तिमत्व विकासाकरिता एम.बी.ए.च्या अभ्यासक्रमामध्ये सैद्धांतिक विषयाबरोबरच सेमिनार, ग्रुप चर्चा, रोल प्ले, केस स्टडीज, समर इंटर्नशिप प्रोग्राम, व्यवस्थापन थेरीज वर आधारित गेम्स, वर्कशॉप, औद्योगिक अभ्यास दौऱ्याचे नियोजन, इंडस्ट्री-एक्स्पर्ट लेक्चरर्स, कॅम्पस प्लेसमेंट्स, ई. विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. ह्या सर्व उपक्रमांचे वैशिष्ट्य असे आहे की, ह्या सर्व कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन हे विद्यार्थ्यांनीच करायचे असल्यामुळे त्यांच्यामध्ये विविध कौशल्याचा विकास होतो. आणि यामुळेच एम.बी.ए. ची पदवी ही इतर अभ्यासक्रमापेक्षा वेगळी व महत्त्वाची ठरते. आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये यशस्वी होण्यासाठी व स्वत:चे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वेगवेगळ्या व विविध व्यवस्थापन व प्रशासनामधील संकल्पनांची समज, चांगले संभाषण कौशल्य, विश्लेषणात्मक क्षमता, सतत नव-नवीन कल्पना शिकून त्या अमलात आणण्याची क्षमता, निर्णय क्षमता,नेतृत्वगुण आदी गुणांची नितांत आवश्यकता असते. पदवीपर्यंतच्या शिक्षणामध्ये हे गुण विकसित करण्याची संधी प्रत्येकालाच मिळते, असे नाही. त्यामुळे एम.बी.ए.ला प्रवेश घेतल्यानंतर स्वत:ची क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करावा लागतो.

खरं पाहता, एमबीए प्रवेश झाल्यानंतर एमबीएची दोन वर्षं ही आत्मविश्वास वाढवण्यासाठी, संभाषण कौशल्ये सुधारण्यासाठी, विचार करण्याच्या क्षमतेला चालना व वाव देण्यासाठी वापरायची आहेत. कारण, दोन वर्षांनंतर विद्यार्थी करिअरचा पाठपुरावा करण्यासाठी उत्साहाने 'जॉब मार्केट'च्या समुद्रामध्ये प्रवेश करण्यास तयार असतील.

एमबीए मधील चार सत्रामध्ये विशेषकरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याची तयारी करून घेतली जाते. ह्या गतिमान झालेल्या विश्वामध्ये आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात उपलब्ध होवू शकते. एमबीए प्रोग्राम्, फी, विविध प्रवेश परीक्षा ई. माहिती उपलब्ध होतेच पण त्याही पलिकडे जाऊन एमबीए प्रोग्राम बाबतीत माहिती करून घेणे गरजेचे वाटते. एम.बी.ए.च्या अभ्यासक्रमाची दोन वर्ष अगदी विचारपूर्वक रचण्यात आली आहेत. संपूर्ण अभ्यासक्रम हा सेमिस्टर पॅटर्न वर आधारित आहे. दोन वर्षा मध्ये एकून ४ सेमिस्टर द्यावे लागतात, ज्या मध्ये दोन सेमिस्टर ही सर्वांसाठी सारखीच असतात. म्हणजे पहिले दोन सेमिस्टर जे आहेत त्यात सर्व विद्यार्थ्यांना सारखेच विषय शिकावे लागतात. याठिकाणि विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे अपेक्षित असते. पण याबाबतीत सर्वसाधारणपणे येणारा अनुभव असा, की असे घडत नाही. केवळ अंतिम परीक्षेमध्ये चांगले गुण मिळावे हा हेतू मनात ठेवून या विषयांकडे पाहिले जाते. वस्तुत: विद्यार्थ्यांनी पहिले दोन सेमिस्टर मध्ये प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करणे हे आवश्यक असते. प्रथम वर्षांत शिकण्यासाठी असलेले अनेक विषय म्हणजे द्वितीय वर्षातील वैकल्पिक विषयाचा व एम.बी.ए. पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीचा तो पायाच असतो. त्यामुळे त्या संपूर्ण विषयाचा सखोल अभ्यास करणे गरजेचे ठरते. (क्रमश:)

**डॉ. ताहीर स. झारी**
प्र.संचालक,डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज,(एम.बी.ए.),
देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर)